MHRG110011352017

## नियमित दिवाणी दावा क्र.१२६/२०१७ मधील निशाणी क्र.७१ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम आदेश ६ नियम १७ प्रमाणे दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी यांनी नमुद केले की, दावा कलम २ मध्ये "माझे वडील दिनांक २४.०८.२०१२ रोजी मयत झाले." असा मजकूर नजर चुकीने लिहिला आहे. सदर मजकूराऐवजी "माझे वडील दिनांक १२.१२.१९९४ मध्ये मयत झाले असा मजकूर असणे आवश्यक आहे. सदरची चुक ही नजर चुकीमुळे झाली असल्याने दुरुस्तीची परवानगी देण्यात यावी अशी वादीने विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी निशाणी क्र. ७५ वर म्हणणे सादर करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादींनी नमूद केले की, वादीने यापूर्वी दोन वेळा दाव्यामध्ये दुरुस्ती केलेली आहे. वादी दुरुस्तीचे अर्ज दाखल करीत असल्यामुळे दाव्याचे काम प्रलंबित राहत आहे. वादी हेतूपुरस्कृत खोटे बोलत असल्याचे स्पष्ट होते. दावा दाखल करुन बरेच वर्षे झाले तरी देखील सदरची बाब वादीला समजली नाही ही पटण्यासारखी बाब नाही. वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी प्रतिवादींनी विनंती केलेली आहे.

४. अभिलेखावरील दस्तऐवजाची पाहणी केली असता दिसून येते की, प्रस्तुतचा दावा हा सरस निरस धडे वाटपाकरिता व घोषणेकरिता

दाखल केलेला आहे. प्रस्तुतचे प्रकरण वादीच्या पुराव्याकरिता प्रलंबित आहे. वादीला आपल्या वडीलांचा मृत्यू दिनांक चुकीचा नमूद करण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. म्हणून प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने त्यांच्या वडीलांचा मृत्यू दिनांक २८.०८.२०१२ नजर चुकीने टाकल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

५. दाव्याचे स्वरुप पाहता सदरची दुरुस्तीची मागणी मंजुर केल्यास प्रतिवादींना कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व दाव्याचे स्वरुप बदलणार नसल्याचे दिसुन येते. तसेच, इतर कोणाच्या अधिकारावर त्याचा परिणाम होणार नसल्याचे देखील दिसुन येते. प्रक्रियेची बहुविधता टाळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे आवश्यक असल्याचे दिसुन येते. वादीने प्रस्तुत दुरुस्ती करण्याकरिता केलेल्या विलंबाबाबत वादीवर योग्य खर्च लादणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबींचा एकत्रितरित्या विचार करता मी या निष्कर्षाला आलो आहे की, वादींचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याकरिता केलेल्या विलंबाकरिता वादीने प्रतिवादींना रक्कम रुपये ५००/– पुढील तारखेपर्यंत देण्यात यावे.

३. वादीने दुरुस्तीची प्रत पुढील तारखेपर्यंत सादर करावी.

 नियमित दिवाणी दावा क्र.१२६/२०१७.
बाबू लकेश्री वि. रंजना लकेश्री वगैरे.

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2025.01.27 17:54:05 +0530

माणगांव. (जी. सी. फुलझळके)
दिनांक – २७.०१.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगांव